पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,
पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००
E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in

---

# प्रेस नोट

दि.०७/०१/२०२२

## पोलीस रेझिंग डे निमित्त ग्रामीण पोलीस दलातर्फे मुद्देमाल प्रदान कार्यक्रमाचे आयोजन

---

दिनांक ०२/०१/२०२२ ते दिनांक ०८/०१/२०२२ या कालावधीत पोलीस रेझिंग डे साजरा करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने **श्री.सचिन पाटील, पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण** यांचे सुचना व मार्गदर्शनाने विविध कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्यातील एक उपक्रम फिर्यादिस मुददेमाल परत करण्याचा कार्यक्रम हा दिनांक ०७/०१/२०२२ रोजी अपर पोलीस अधिक्षक, मालेगाव कार्यालय येथील सुसंवाद हॉल येथे पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण श्री.सचिन पाटील यांचे हस्ते मुळ मालकास मुद्देमाल प्रदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी पोलीस अधीक्षक श्री. सचिन पाटील, अपर पोलीस अधीक्षक श्री चंद्रकांत खांडवी तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. जिल्हयातील पोलीस ठाणे निहाय दाखल असलेले गुन्हयांमध्ये हस्तगत केलेला किंमती मुद्देमाल तक्रारदारांना प्रदान कार्यक्रम पार पडला. मालाविरूध्दचे गुन्हयांमध्ये चोरीस गेलेले सोने-चांदीचे दागिने सुमारे ३३ लाख ३९ हजार २५७ रूपये व रोख रक्कम सुमारे १ लाख ७५ हजार रूपयेचा मुद्देमाल मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे संबंधीत तक्रारदारांना प्रदान करण्यात आला आहे. नाशिक ग्रामीण जिल्हयातील पोलीस ठाण्यांनिहाय दाखल असलेले मालाविरूध्दचे गुन्हयांमधील उघडकीस आलेले गुन्हयांमध्ये हस्तगत करण्यात आलेला सुमारे ३५ लाख १४ हजार २५७ रूपये किंमतीचा विविध मद्देमाल संबंधीत तक्रारदारांना वाटप करण्यात आला. यामुळे नागरीकांमध्ये समाधानाचे वातावरण होते.

पोलीस ठाण्यांमध्ये विविध गुन्हयांमधील जप्त/हस्तगत करण्यात आलेला प्रलंबित मुद्देमाल मा.न्यायालयाचे आदेशान्वये संबंधीत तक्रारदारांना दर महिन्याचा आढावा घेवुन वाटप करण्यात यावा तसेच बेवारसरित्या मिळुन आलेल्या मुद्देमालाचा त्वरित निपटारा करावा याबाबत **पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण श्री.सचिन पाटील** यांनी उपस्थित पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शक सुचना दिल्या. तसेच नागरीकांनी बाहेरगावी जातांना विशेष काळजी घ्यावी, दागिणे, पैसे बॅंकेत ठेवावेत, बाहेर जातांना शेजा-यांना कल्पना दयावी, शक्य असल्यास सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसवावेत. तसेच मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन योग्य ती खबरदारी घेवुन पोलीस दलास सहकार्य करावे असे आवाहन यावेळी उपस्थित नागरीकांना करण्यात आले.